सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ८० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ४ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# पश्चिम बंगाल मध्ये भगव्या लाटेचा प्रभाव, ममता बॅनर्जीचा सुफडा साफ

## तमिलनाडु मध्ये थालपतीचा उदय, तर केरल मध्ये कॉंग्रेस चे पुनरागमन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४कोलकाता**

पश्चिम बंगालमध्ये भाजपाने कल्पनेपलिकडचे यश मिळवले. १४७ बहुमताचा आकडा असलेल्या पश्चिम बंगालमध्ये भाजपाने दोनशेपर्यंत मजल मारली आहे. तर दुसरीकडे सत्तेत असलेल्या तृणमूल कॉंग्रेसला ८८ जागांवरच आघाडी मिळाली आहे. बंगालमधील हे राजकारण दोन वर्षात पूर्णपणे बदलेलं दिसलं. बरोबर दोन वर्षांपूर्वी लोकसभेच्या निवडणुकीत ममतांच्या तृणमूल कॉंग्रेसने बंगालमध्ये भाजपाला मर्यादित जागांवर रोखत २९ जणांना निवडून आणले. पण, आता ममतांच्या हातातील सत्ताच भाजपाने हिसकावून घेतली.

मागील १५ वर्षांपासून पश्चिम बंगालमध्ये सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या पराभवाला ज्या गोष्टी कारणीभूत ठरल्या, त्यात गंभीर स्वरुपाचा भ्रष्टाचार, घोटाळे आणि आरजीकर रुग्णालयातील अत्याचार प्रकरण. मागील दोन वर्षात तृणमूलच्या अनेक नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले गेले आणि तेच मुद्दे भाजपाने लोकांवर बिंबवले. त्यामुळे तृणमूलची प्रतिमा डागाळली गेली.

तृणमूलचे सरकार असताना शिक्षक भरती झाली. त्यात अनियमितता झाल्याचे प्रकरण गाजले. इतकंच नाही, तर रेशनमध्येही गैरव्यवहार झाल्याच्या प्रकरणाने ममता सरकारची प्रतिमा वाईट केली. हेच मुद्दे भाजपाकडून उचलले गेले. त्यात भाजपाने आणखी एका मुद्द्याची भर घातली ती



म्हणजे महिला सुरक्षा. याच मुद्द्यावरून भाजपाने वारंवार ममता बॅनर्जींच्या सरकारला घेरण्याचे प्रयत्न केले. कोलकात्यातील आरजी कर महाविद्यालयात अत्याचार आणि हत्या झालेल्या पीडित डॉक्टर तरुणीच्या आईलाच उमेदवारी दिली. त्याचा थेट फायदा निवडणुकीत भाजपाला झाला. यात आणखी एक घटक महत्त्वाचा ठरला तो म्हणजे सरकारविरोधात असलेली नाराजी. त्या नाराजीच्या विस्तवाला भाजपाने आणखी हवा दिली. भाजपाने या निवडणुकीत बांगलादेशी घुसखोरांच्या मुद्द्याचा ममता सरकारविरोधात वापर केला. ममता बॅनर्जी यांचे सरकार सीमेवर सुरक्षा जाळे उभारण्यास अडथळे आणत असल्याचा आरोप भाजपाकडून केला गेला. त्याचबरोबर पश्चिम बंगालमध्ये घुसखोर मतदान करत असल्याचा मुद्दाही अधोरेखित केला गेला. भाजपाकडून पश्चिम बंगालमध्ये गेल्या दोन वर्षात हिंदुत्वाच्या मुद्द्यावरही जोर दिला गेला. हिंदू महिलांची सुरक्षा, तृणमूल कॉंग्रेसचे धोरण यावरही लक्ष्य केले गेले. ममतांचे सरकार हे हिंदू विरोधी असल्याचा प्रचार भाजपाकडून केला गेला. त्यासाठी वेगवेगळ्या हिंदू सण उत्सवावेळी झालेल्या संघर्षाच्या घटनांचे दाखले दिले गेले. पश्चिम बंगालमध्ये भाजपाची वाढ ही अचानक घडलेली घटना नसून दीर्घकालीन रणनीती, मजबूत संघटन आणि मतदारांतील बदल यांचा एकत्रित परिणाम आहे. दुसरीकडे ढचउ ला अँटी इन्कम्बन्सी आणि बदलत्या राजकीय वातावरणाचा फटका बसल्याचं दिसतंय.

### निकालानंतर पश्चिम बंगालमध्ये तणाव! TMC चे कार्यालय पेटवले

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सुरू असतानाच, राज्याच्या अनेक भागांत हिंसाचाराच्या घटना घडल्याचे वृत्त आहे. भारतीय जनता पार्टी ऐतिहासिक विजयाच्या उंबरठ्यावर असून, या विजयामुळे ममता बॅनर्जी यांच्या १५ वर्षांच्या सत्तेला सुरूंग लागला आहे.

मतमोजणी दरम्यान, राजकीय कार्यकर्त्यांमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तृणमूल कॉंग्रेसचे एक पक्ष कार्यालय पेटवून देण्यात आले. आसनसोल आणि दिनहाटा येथील मतमोजणी केंद्रांवर संघर्षाच्या घटना घडल्याचे वृत्त आहे. आसनसोल इंजिनिअरिंग कॉलेज येथील मतमोजणी केंद्रावर, मतदान प्रतिनिधींमधील किरकोळ झटापटीचे एका मोठ्या संघर्षात रूपांतर झाले.आसनसोल-दुर्गापूर पोलीस आयुक्तालयाचे आयुक्त प्रणव कुमार यांच्या मते, काही समाजकंटकांनी एका राजकीय पक्षाच्या कार्यालयांना लक्ष्य केले असून, यामध्ये सहभागी असलेल्यांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# पश्चिम बंगाल, तामिळनाडूने बदललं देशाचे राजकारण

## इंडिया आघाडीच्या भवितव्यावरही प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४मुंबई-** पश्चिम बंगालम
भाजपा, तामिळनाडूमध्ये टीव्ही
केरळात कॉंग्रेस आघाडी, आसामम
भाजपा आणि पद्दुचेरीमध्ये भाज
आघाडी! देशातील चार राज्ये अ
एका केंद्र शासित प्रदेशात झाले
विधानसभा निवडणुकीचे चित्र स
झाले आहे. भाजपाच्या नेतृत्वाखा



एनडीएचा आत्मविश्वास या निकालाने वाढवला आहे, तर इंडिया आघाडीचे काय होणार, या चर्चेला तोंड फुटले आहे. पश्चिम बंगालमध्ये भगवामय करण्याचे भाजपाचे स्वप्न पूर्ण झाले. ममता बॅनर्जी यांच्या सत्तेला सुरूंग लावत भाजपाने पश्चिम बंगालमध्ये प्रचंड बहुमत मिळवले. आसाममध्येही सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवण्यात भाजपाला यश आले. तामिळनाडूमध्ये विजय यांच्या टीव्हीके इंडिया आघाडीलाच झटका दिला. तर केरळात कॉंग्रेसने डाव्यांचा पराभव केला. पण, या चार राज्यांच्या निकालाने इंडिया आघाडीचीच पिछेहाट झाली आहे.

२०२४ मधील लोकसभा निवडणुकीपूर्वी यूपीए विसर्जित करून इंडिया आघाडीची स्थापना करण्यात आली. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडी सत्तेपर्यंत मजल मारता आली नाही, पण चांगले यश मिळाले. मात्र, त्यानंतर झालेल्या वेगवेगळ्या राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीलाच तडे जाताना दिसले. आता तामिळनाडू, पश्चिम बंगालच्या निकालांनी त्यात भर घातली आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते लोकसभा निवडणुकीत एकसंध असणारी इंडिया आघाडी विधानसभा निवडणुकांवेळीच जास्त कमकुवत होत गेली. आता पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतही ममतांनी कॉंग्रेसला सोबत घेणे टाळले. तर तामिळनाडूतही कॉंग्रेसचा फार फायदा द्रमुकला झाला नसल्याचे दिसत आहे.

# बंगालच्या लोकांनी कुशासनातून राज्याला बाहेर काढलं-फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४कोलकाता**आजही देशात जनतेला एकच गोष्टी माहीत आहे. ती गोष्ट म्हणजे मोदी है तो मुमकिन है. बंगालला कुशासनातून बाहेर काढण्याचं काम जनतेने केलं आहे. ३० वर्षे कॉंग्रेस, ३६ वर्षे कम्युनिस्ट आणि या दोघांपेक्षा खतरनाक म्हणजे ममतादीदींचं शासन. बंगाल देशातलं पहिलं औद्योगिक राज्य होतं. सात हजार इंडस्ट्री तिथून सोडून गेल्या.



बंगालची अवस्था जंगलराज झाली होती. पण माननीय मोदींनी जे व्हिजन मांडलं, जो आशेचा किरण दाखवला त्यावर लोकांनी विश्वास दाखवला. जनतेला हा विश्वास बसला की बंगालचं परिवर्तन कुणी करु शकतं तर त्या व्यक्तीचं नाव नरेंद्र मोदी हेच आहे असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.आजचा दिवस हा सगळ्यांसाठी एक ऐतिहासिक दिवस आहे. मी बंगालमध्ये गेलो होतो तेव्हा मला पत्रकार परिषदेत तिथल्या एका पत्रकाराने विचारलं होतं की ममतादीदी म्हणतात भाजपा आणि त्यांचे नेते बंगालच्या बाहेरचे आहेत. बाहेरचे लोक मतं मागतात. पण खरा बंगालचा पक्ष कुठला ते ममतादीदींना दाखवून दिलं बंगालचा खरा पक्ष भाजपाच आहे. बंगालच्या लोकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर विश्वास दाखवला आणि बंगालमध्ये महापरिवर्तन करुन दाखवलं. ते इतकं आहे की दोन तृतीयांश संख्याबळ भाजपाला मिळते आहे. बंगाल, आसाम, पुद्दुचेरीमधला विजय मोदींवरच्या विश्वासाचा विजय आहे.

# केरळमध्ये भाजपनं खातं उघडलं

## डाव्या पक्षांच्या बालेकिल्ल्यात विजय मिळवला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४तिरुअनंतपुरम :** केरळमध्ये गेल्या दहा वर्षांपासून सत्तेत असलेल्या डाव्या पक्षांचा पराभव झाला आहे. केरळ विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसप्रणित यूडीएफ सत्ता स्थापन करण्याच्या दिशेनं वाटचाल करत आहे.



डाव्या पक्षांच्या एलडीएफचा यावेळी पराभव झाला आहे. केरळमध्ये भाजपनं पहिला विजय मिळवला आहे. तर, आणखी दोन ठिकाणी भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत. डाव्या पक्षांचा बालेकिल्ला असलेल्या चथन्नूर मतदारसंघात भाजपनं विजय मिळवला आहे. २०२१ मध्ये चथन्नूर विधानसभा मतदारसंघात डाव्या पक्षानं १७ हजार मतांनी विजय मिळवला होता. केजागारळमध्ये कॉंग्रेसच्या यूडीएफला १०२ जागांवर आघाडी मिळाली आहे. तर, डाव्या पक्षांच्या एलडीएफला ३५ जागांवर आघाडी मिळाली आहे. भाजपनं एका जागेवर विजय मिळवलाय तर दोन ठिकाणी ते आघाडीवर आहेत.

भाजपचे उमेदवार बीबी गोपकुमार यांनी डाव्या पक्षांचे उमेदवार ॲड. आर. राजेंद्रन यांचा ४३९८ मतांनी पराभव केला आहे. याशिवाय भाजपचे उमेदवार नेमोम आणि कझकोट्टम विधानसभा मतदारसंघातून आघाडीवर आहेत. भाजपच्या बीबी गोपकुमार यांना चथनूर विधानसभा मतदारसंघात ५१९२३ मतं मिळाली आहेत. त्यांच्या विरोधात लढणाऱ्या भाकपच्या आर राजेंद्रन यांना ४७५२५ मतं मिळाली आहेत.तिसऱ्या क्रमांकावर कॉंग्रेसचे सूरज रवी आहेत, त्यांना ३५२७६ मतं मिळाली आहेत. या मतदारसंघात आम आदमी पार्टीला ६१३ मतं मिळाली आहेत. सायंकाळी पाचपर्यंतच्या आकडेवारीनुसार भाजप आणखी दोन जागांवर आघाडी मिळवत आहे. गोपकुमार यांनी विजय मिळवला आहे. तर नेमम विधानसभा मतदारसंघात राजीव चंद्रशेखर आघाडीवर आहेत. त्यांना जवळपास तीन हजार मतांची आघाडी आहे.

# बारामतीत सुनेत्रा पवारांचा विक्रमी विजय

## २.१८ लाख मताधिक्याने देशात नवा इतिहास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४बारामती-** उत्तर प्रदेशातील साहिबाबाद मतदार संघातून २०२२ साली विजयी झालेल्या सुनील कुमार शर्मा यांच्या नावे २ लाख १४ हजार ८३५ एवढ्या विक्रमी मताधिक्याची नोंद देशात होती. ती मोडीत काढत २ लाख १८ हजार ९३० मतांनी बारामती विधानसभा पोटनिवडणूकीत महायुतीच्या उमेदवार व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विजय मिळविला. बारामतीच्या पोटनिवडणूकीत मतांचा विक्रम प्रस्थापित करावा असे आवाहन खुद्द मुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बारामतीत प्रचार सांगता सभेत केले होते. बारामतीकरांनी ते मनावर घेत देशातील सर्व विक्रम मोडीत काढत नवा विक्रम प्रस्थापित केला.बारामतीच्या



पोटनिवडणूकीसाठी ५८.१७ टक्के मतदान झाले होते. एकूण ३ लाख ८४ हजार ५७९ मतदारांपैकी २ लाख २३ हजार ७०५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. सोमवारी (दि. ४) बारामती एमआयडीसीतील राज्य वखार महामंडळाच्या गोदामात सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. पहिल्या फेरीपासूनच पवार यांनी त्यात प्रचंड आघाडी घेतली. फेरीनिहाय त्यांची आघाडी वाढतच गेली.

१८ व्या फेरीतच त्यांनी २०१९ साली अजितदादांनी येथे प्रस्थापित केलेला १ लाख ६५ हजार २६५ मतांचा विक्रम मोडला. त्यानंतरच्या पुढील प्रत्येक फेरीत त्यांचे मताधिक्य वाढतच गेले. २० नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडलेल्या पंचवार्षिक निवडणूकीत बारामतीत ७१.२७ टक्के मतदान झाले होते. पवार विरुद्ध पवार अशी लढत झाली होती. त्यावेळी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अजितदादा पवार यांना ईव्हीएम व पोस्टल अशी १ लाख ८१ हजार १३२ तर युगेंद्र पवार यांना ८० हजार २३३ मते मिळाली होती.१ लाख ९०९ मतांनी अजितदादा पवार विजयी झाले होते. अजितदादा यांच्या अकाली निधनानंतर लागलेली पोटनिवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न झाला.

# राहुरीत अक्षय कर्डिले यांचा सहज विजय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४राहुरी-**राहुरी विधानसभेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीच्या मतमोजणीत भाजपचे उमेदवार अक्षय शिवाजी कर्डिले १ लाख १२ हजार ५८७ इतक्या विक्रमी मतांनी विजयी झाले. इतर सर्व ६ उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या. विजय जाहीर होताच भाजप कार्यकर्त्यांनी मतदान केंद्राबाहेर गुलाल उधळून जल्लोष केला.



पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग व अनिल मोहिते यांच्या उपस्थितीत विजयी उमेदवार अक्षय कर्डिले यांनी निवडणूक निर्णय अधिकारी अनुपकुमार यादव यांच्याकडून प्रमाणपत्र स्वीकारले. मंत्री विखे यांनी अक्षय कर्डिले यांचा सत्कार केला. तसेच निवडणूक योग्य पद्धतीने हाताळल्याबद्दल प्रशासनालाही धन्यवाद दिले.भाजपचे अक्षय कर्डिले यांना एकूण १ लाख ४० हजार ९३ मते मिळाली तर त्यांचे लगतचे प्रतिस्पर्धी उमेदवार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (शरद पवार गट) गोविंद मोकाटे यांना २७ हजार ५०६ मते मिळाली.

एकूण ४१२ टपाली मतदान झाले. त्यातील २९ मते बाद झाली. कर्डिले यांना २८३ मते मिळाली.वंचित बहुजन आघाडीचे संतोष शेळके यांना ५६९०, ठाकरे गटाचे बंडखोर रावसाहेब खेवरे यांना ७२९९, अपक्ष ड. अथर्व म्हसे ११४८, सूर्यभान उर्फ सुरेश लांबे १३६८, महेश हापसे यांना २०५१ तर नोटाला १६३२ मते मिळाली.

# पश्चिम बंगालमध्ये विकासाची बुलेट ट्रेन वेगाने धावेल

## DCM शिंदेंकडून मोदी-शाह यांचे अभिनंदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ मुंबई**

भाजपासाठी एक ऐतिहासिक दिवस आहे. पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदाच कमळ फुलले आहे. आपले लोकप्रिय आणि यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपाने ममता दीदींना पराभवाची 'झालमुडी' दिली आहे. गुंडगिरी आणि भ्रष्टाचाराला कंटाळलेल्या जनतेने पश्चिम बंगालमध्ये खऱ्या लोकशाहीची स्थापना केली आहे. त्यांनी विकास, प्रगती, स्थैर्य आणि शांततेसाठी मतदान केले आहे. हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष आहे. या शताब्दी वर्षात पूजनीय श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या जन्मभूमीत भाजपाचा विजय हा सर्वार्थाने ऐतिहासिक आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले.देशभरात पाच राज्ये आणि महाराष्ट्रातील दोन पोटनिवडणुकीसाठी झालेल्या मतदानाचे निकाल समोर येत आहेत. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत सुरुवातीला जे कल हाती येत आहेत, त्यानुसार भाजपाने जोरदार मुसंडी मारली आहे. ममता बॅनर्जी यांचे सरकार कोसळत असल्याचे पाहायला मिळत आहे. पश्चिम बंगाल येथे सत्तांतर होणार असल्याचे चित्र आहे.



यातच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्सवर पोस्ट करत पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांचे अभिनंदन केले. भाजपाला पश्चिम बंगालच्या काली माता आणि आसामच्या कामाख्या देवी यांचा आशीर्वाद लाभला आहे. 'आसाममध्ये विजय सोपा आहे, फक्त भाजप हीच ओळख आहे' ही घोषणा पुन्हा एकदा खरी ठरली आहे. भारतीय जनता पक्ष आसाममध्ये सलग तिसऱ्यांदा सत्तेवर येत आहे. आसामच्या नागरिकांनी देशाचे लोकप्रिय आणि यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि खंबीर गृहमंत्री अमित शाह यांच्या दूरदृष्टीवर पुन्हा एकदा आपला पूर्ण विश्वास व्यक्त केला आहे. जनतेने मुख्यमंत्री डॉ. हिमंता बिस्वा सरमा यांच्या विकास धोरणांवर आणि कार्यावर विश्वास दर्शवला आहे.

## संपादकीय ......

# कायद्याचे कुचकामी कागदी घोडे!

*पुण्यातील नसरापूर अत्याचार, चाकणमधील लहानग्यावरील अत्याचार, एकतर्फी प्रेमातून पुण्यातील चाकूहल्ला या तीनही घटना पुण्यात घडल्या. केवळ पुण्यातच अशा घडतात आणि राज्याच्या तसेच देशाच्या इतर भागात सगळेच आलबेल आहे, असा समज करणे धोक्याचे आहे. महिला, मुले, लहान मुलामुलींवरील अत्याचाराच्या घटना काही तास किंवा दिवसांच्या फरकाने अनेक भागात घडतच असतात, त्यामुळे आताच झालेल्या घटनांमुळे त्याचे गांभीर्य नव्याने समोर आलेले आहे, असेही नाही. एकाच दिवशी किंवा काही तासांच्या अंतराने घडलेल्या आणि समोर आलेल्या या अमानवीय नृशंस घटनांमुळे आपला समाज समुदाय त्याआधी खूपच सोज्ज्वळ किंवा सभ्य होता, असाही तर्क काढता येणार नाही. या घटना समोर आल्यानंतर पोलीस चौकशी आणि कारवाई सुरू झाली आहे. परंतु कित्येकदा अशा अनेक घटना समोर येतही नाहीत. लोकलज्जेखातर पोलीस ठाण्यापर्यंत अशा कित्येक घटना पोहचतही नाहीत. त्यामुळे केवळ रेकॉर्डवर आल्यामुळे त्यांचे स्वरुप, संख्या आणि व्याप्ती एवढीच आहे, असे समजणे हा भ्रम आहे. बदलापूर अत्याचार प्रकरण किंवा त्यानंतर राज्यात उघड झालेल्या अत्याचार, हत्येच्या प्रकरणांनंतर या विषयी जनमत संतप्त होते, ते स्वाभाविक आहे. या संतप्त समाजमनाकडून आंदोलने, बंद, रास्ता रोको केले जातात. प्रक्षुब्ध जमावाला नियंत्रणात आणणे आणि लोकांमधील संताप कमी करण्यासाठी पोलिसांची कसोटी लागते, परंतु अशा घटनांमध्येही राजकारण आणि सोयीचा जातीयवाद शोधणार्यांचेही प्रमाण समाजमाध्यमांवर वाढलेले असते. अशा घटनांचा निषेध करणे, आरोपींना कठोर कायद्यानुसार शिक्षा करण्याची मागणी करणे हा नागरिकांचा अधिकार आहे. त्याविषयी दुमत नाही, परंतु अशा घटनांचे गांभीर्य आणि संवेदनशीलता समजून न घेता, त्यातून आपली राजकीय, सामाजिक हेत्वारोपाची पोळी भाजून घेण्याचे समाजमाध्यमातून होणारे प्रयत्नही आपल्या निखळ माणूसपणाबद्दल शंका उपस्थित करणारे आहेत.*

*अशा घटना घडल्यावर जागे होण्यापेक्षा या घडूच नयेत किंवा त्यासाठी कायद्यात आणि सामाजिक नियमातील 'पळवाटा' बंद करण्याची पहिली गरज आहे. आता आधुनिक जगात पोलिसांचा धाक राहिलेला नाही, समाजाचाही धाक उरलेला नाही, कुटुंब, सामाजिक मूल्यांची जोपासना केली जात नाही, अशी व्याख्याने देऊन समाजाला बोधामृत पाजण्याची ही वेळ नाही. सैतानालाही लाजवेल अशा पद्धतीने माणूस पिसाळल्यासारखा का वागू लागला आहे? कार्यालयात होणारे महिलांचे शोषण, कौटुंबिक विषप्रयोग, रस्त्यातील दिवसा ढवळ्या होणार्या हत्या, अंधश्रद्धेतून महिलांचे होणारे शोषण या घटनांनी आपण माणूस म्हणून ओळखल्या जाणार्या समाजात राहत असल्याबाबत शंका यावी. इथली माणसे लैंगिक पिपासेतून 'झोंबी' झाली आहेत का? असा प्रश्न पडावा. या प्रश्नाचे उत्तर स्वत:लाही न वगळता खरेखरे द्यायला हवे. नसरापूर, बदलापूर, ठाणे, पुणे, चाकण, महाळुंगे अशा कितीतरी घटना आपल्या भोवताली घडत असताना आधीची घटना विसरून नव्या अत्याचाराची वाट पाहिली जात असल्यासारखी परिस्थिती आहे. यानिमित्त पोलिसांवरील दबावाची चर्चा केली जाते. अशा संवेदनशील घटनांमध्येही पोलिसांवर दबाव आणण्याचे प्रयत्न केलेच कसे जातात? या प्रश्नाची पुरेशी चर्चा केली जात नाही. यातील आरोपींना तात्काळ फाशीच व्हायला हवी, ही मागणी रास्त आहे. यातील आरोपीला पुन्हा समाजात माणूस म्हणून सहभागी होण्याचा आणि जगण्याचा अधिकार व्यवस्थेने नाकारायलाच हवा, हेही खरेच. परंतु असे करत असताना अशा घटना रोखण्यासाठी हा उपाय पुरेसा आहे का? याचाही विचार व्हायला हवा. आपल्याकडील बालकांचे अधिकार आणि न्यायाचे संरक्षण करणार्या संस्था, बालक आणि महिला आयोग, पोलीस तसेच इतर सुरक्षा यंत्रणांवर नागरिकांचा विश्वास उरलेला आहे का? त्यामुळेच नागरिक रस्त्यावर निषेध करायला उतरत आहेत. हा गमावलेला विश्वास व्यवस्थेने परत मिळवायला हवा.*

*अत्याचाराच्या कोणत्याही घटनेवेळी पीडितेची आणि आरोपीची जात, धर्म पाहून न्यायाधीशाच्या भूमिकेत शिरणे समाज म्हणूनही कमालीचे धोक्याचे आहे. अशा घटनांना जबाबदार असलेल्यांना कायद्याचा धाक राहिलेला नाही, हे स्पष्ट आहेच. समाज आणि कायद्याचा हा धाक कायम राहावा म्हणून केवळ फास्ट ट्रॅक कोर्ट उभारणे पुरेसे नाही. मागील सहा महिन्यांची वर्तमानपत्रे जरी चाळली तरी अशा कित्येक घटनांची उदाहरणे समोर येतील, परंतु त्यातील कितीजणांना तातडीने कायदेशीर मार्गाने कठोरात कठोर शिक्षा झाली, तर ते प्रमाण घटनांच्या तुलनेत नगण्य ठरावे. केवळ कागदावरील कायदा संरक्षणासाठी उपयोगाचा नाही. महिलांच्या शक्ती कायद्याचे काय झाले? हा कायदा अस्तित्वात आल्यापासून आजपर्यंत किती आरोपींना या कायद्यानुसार कठोर म्हणजेच फाशी किंवा मृत्यूदंडाची शिक्षा ३० दिवसांच्या आत ठोठावण्यात आली? कठोर निर्णयांची कितपत अंमलबजावणी झाली? कायदे केवळ कागदावरच राहिले तर ते कुचकामी ठरतील, परिणामी लोकच आपल्या पद्धतीने रस्त्यावर न्याय करतील. इतकी वेळ नागरिकांवर येऊ नये. सोबतच माणसातला पशू एवढा कसा पिसाळला? याचाही शोध समाज समुदाय म्हणून आपल्याला घ्यावा लागणार आहे. समाजशील माणूस म्हणून आपण सर्वांनीच पूर्वग्रह न ठेवता आपल्या समुदायाविषयी आत्मचिंतन करायला हवे. विलंबने मिळणारा न्याय हा अन्यायच असतो, व्यवस्थेने याचे गांभीर्य वेळीच समजून घ्यायला हवे.*

# लोकशाहीच्या तिन्ही स्तंभांनी डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न पुर्ण करण्याचे प्रयत्न केले – माजी सरन्यायाधीश भूषण गवई

## चांदूर रेल्वेच्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नवीन इमारतीचा कोनशिला समारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.४चांदूर रेल्वे –** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यांनी ४ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटनेचा अंतिम मसुदा सादर केला आणि त्यावर सखोल चर्चा झाली. त्यानंतर २५ नोव्हेंबर १९४९ च्या भाषणात त्यांनी वन पर्सन, वन व्होट, वन व्हॅल्यू या तत्त्वावर राजकीय लोकशाही उभी राहत असली तरी सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित झाल्याशिवाय त्या लोकशाहीला अर्थ नाही, असा असे म्हटले होते. आज राज्यघटनेला ७५–७६ वर्षे पूर्ण झाली असून विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका या लोकशाहीच्या तिन्ही स्तंभांनी बाबासाहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी निश्चित प्रयत्न केले आहेत, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायधीश भूषण गवई यांनी केले. ते चांदूर रेल्वे येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नवीन इमारतीचा कोनशिला समारंभाच्या प्रसंगी रविवारी (ता. ३) बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रभारी प्रमुख रितेश वाघमारे, या कार्यक्रमाचे उद्घाटक सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश भूषण गवई, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अनिल किलोर, न्यायाधीश प्रविण पाटील, महाराष्ट्र व गोवा बारचे सदस्य ड.आशिष देशमुख, चांदूर रेल्वे न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) सुजित राठोड, चांदूर रेल्वे वकिल संघाचे अध्यक्ष ड.राजीव अंबापूरे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते चांदूर रेल्वे येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नविन इमारती बांधकामाचा शुभारंभ कुदळ मारून व नूतन इमारतीचा कोनशिला चे अनावरण करण्यात आले. यावेळी पारंपारिक तूतारी वाजवून जोरदार स्वागत करण्यात आले. प्रमुख अतिथीच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी मार्गदर्शन करतांना सांगीतले की, मी मुळचा वलगाव असल्याने अमरावतीशी नाळ जुळलेली आहे. चांदूर रेल्वे कोर्टाची नविन इमारत मुंबई हायकोर्टाच्या बिल्डींगशी मिळतीजुळती व सर्व सोईयुक्त सुसज्ज इमारत उभी राहणार आहे. यापूर्वी आपण जिल्ह्याचा व तालुक्याच्या कोर्टात गेले तर एकसारखे कोर्ट असायचे आणि ठरलेले त्यांचे डिझाईन असायचे. मुंबई हायकोर्टात न्यायमूर्ती गवई इन्फ्रास्ट्रक्चर कमिटीचे अध्यक्ष होते तेव्हापासुन पहिल्यांदा तेथून कोर्टाच्या इमारतीमध्ये हा बदल सुरू झाले. त्यांच्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात इन्फ्रास्ट्रचरची कामे ऐवढया मोठया प्रमाणात सुरू झाली. आज आपण जे काही डेव्हलपमेंट पाहतो त्याचे श्रेय न्यायमूर्ती भूषण गवई यांना जाते असे न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी यावेळी सांगीतले. यावेळी ड. राजीव अंबापूरे,न्यायमूर्ती प्रविण पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमरावती जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा प्रभारी प्रमुख रितेश वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमाचे संचालन विशाखा पाटील व संजय सहारे यांनी केले. तर आभार चांदूर रेल्वे दिवाणी न्यायाधीश सुजित राठोड यांनी मानले. या कार्यक्रमाला खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार प्रा.वीरेंद्र जगताप,नगराध्यक्ष प्रा.प्रियंका विश्वकर्मा, माजी नगराध्यक्ष गणेश रॉय, चांदूर रेल्वे एसडीओ श्रध्दा उदावंत, सा.बां.विभागाचे अधिक्षक अभियंता पाटील, कार्य.अभियंता पिंजरकर, चां.रे.उपअभियंता खरय्या मॅडम, सहा.गटविकास अधिकारी संजय खारकर, चांदूर रेल्वेचे सर्व नगरसेवक,चांदूर रेल्वे महसुल विभाग,पंचायत समितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच चांदूर रेल्वे,नांदगाव खंडेश्वर सह अमरावती येथील वकिल मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विदर्भात 'केसरआंबा' ची क्रांती

## हितेंद्र रणालेकर यांचा यशस्वी प्रयोग






**विदर्भ प्रजासत्ताक दि.४कुऱ्हा–** पारंपरिक शेतीच्या चौकटीतून बाहेर पडत आधुनिकतेचा स्वीकार केल्यास शेतीही नफ्यात येऊ शकते, याचा प्रत्यय अमरावती जिल्ह्यातील कुऱ्हा येथील युवा शेतकरी हितेंद्र रणालेकर यांनी दिला आहे. केसर आंब्याच्या लागवडीचा त्यांचा प्रयोग आज परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.रणालेकर यांनी केवळ २ एकर क्षेत्रात सुमारे २०० केसर आंब्याची झाडे लावून नियोजनबद्ध पद्धतीने बाग फुलवली आहे. सुरुवातीला हवामान, पाण्याची उपलब्धता आणि योग्य वाण निवडीची आव्हाने असतानाही त्यांनी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला.

ठिबक सिंचन, संतुलित खत व्यवस्थापन, नियमित छाटणी आणि कीड–रोग नियंत्रण या बाबींवर विशेष लक्ष दिल्यामुळे बागेतील झाडांची वाढ जोमाने झाली. यंदाच्या हंगामात मोठ्या प्रमाणात फळधारणा होत असून उत्पादनात लक्षणीय वाढ दिसून येत आहे.विशेष म्हणजे, विदर्भातील उष्ण हवामानातही योग्य नियोजनामुळे केसर आंब्याची गुणवत्ता उत्कृष्ट राहिली आहे. आकर्षक रंग, योग्य आकार आणि गोड चव यामुळे या आंब्याला बाजारात चांगली मागणी मिळत असून व्यापाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.यंदा या बागेतून सुमारे ३ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पारंपरिक पिकांच्या तुलनेत फळबाग शेती अधिक फायदेशीर ठरू शकते, याचे हे उत्तम उदाहरण मानले जात आहे.रणालेकर यांच्या या प्रयोगामुळे परिसरातील अनेक शेतकरी त्यांच्या बागेला भेट देत असून केसर आंब्याच्या लागवडीबाबत माहिती घेत आहेत. भविष्यात अधिक शेतकरी फळबाग शेतीकडे वळण्याची चिन्हे दिसत आहेत.विदर्भात शेतीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी अशा प्रयोगशील शेतकऱ्यांची गरज असून, कमी पाण्यात जास्त उत्पन्न देणारे हे मॉडेल भविष्यासाठी दिशादर्शक ठरू शकते. शासनाच्या योजनांचा योग्य लाभ आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा मार्ग अधिक सुलभ होऊ शकतो.एकूणच, कुऱ्हा येथील 'केसर' आंब्याची ही बाग विदर्भातील शेतीला नव्या दिशेने नेणारी ठरत असून, भविष्यात अशा प्रयोगांमुळे शेती क्षेत्रात सकारात्मक बदल घडण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

# जिल्ह्यातील शाळा २६ जून नंतरच सुरू होणार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती –** राज्यातील शाळांच्या उन्हाळी सुट्टी बाबत व शैक्षणिक वर्ष २०२६–२७ बाबत शासनाने २८ एप्रिल रोजी पत्र निर्गमित केले आहे. त्यानुसार उन्हाळी सुट्टी २ मे पासून जाहीर केली असून राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांचे २०२६–२७ शैक्षणिक सत्र १५ जूनपासुन सुरु करण्यात यावेत, असे नमूद केले आहे. परंतु विदर्भातील तीव्र उष्णतेचा विचार करता दरवर्षी प्रमाणे विदर्भातील शाळेची तारिख दरवर्षी वेगळीच असते. त्याप्रमाणेच यावर्षीही २६ नंतरच सुरु करण्यात याव्यात. अशा सूचना देण्यात आल्या आहे. विदर्भातील तापमानात जून महिन्यात ४५ ते ४६ डिग्री सेल्सिअस असते. तीव्र उष्णतेचा विचार करता विद्यार्थ्यांना उष्माघातासारख्या धोक्यापासून वाचविण्याकरिता विद्यार्थ्यांच्या आरोग्याचाविचार करुन विदर्भातील प्राथमिक माध्यमिक शाळा २६ जून नंतरच सुरु करण्यात याव्यात. अशा सूचना शालेय शिक्षण मंत्रालयाकडून शिक्षण संचालकांना पाठविण्यात आलेल्या आहे. यामध्ये विदर्भातील शाळांकरिता स्वातंत्र्य लेखी आदेश निर्गमित करावे. अशा सूचना देण्यात आल्या आहेत.–

# आदिवासी अभ्यासिकेवर संशयाचे सावट

## अमरावतीत ८ लाखांच्या भाड्याचा 'पहिला प्रयोग' चर्चेत



**विदर्भ प्रजासत्ताकदि. ४अमरावती** ६आदिवासी विकास विभागाच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी काही अंतर्गत लोकांना हाताशी धरून आठ लाख ६८३ रुपये महिन्याचे भाडे असलेली २५० विद्यार्थ्यांची प्रशस्त अभ्यासिका मुख्य बाजारपेठेत सुरू केली. त्यामुळे ही अभ्यासिकाच आता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. अमरावती येथे मुलामुलींचे एक हजार क्षमतेचे सोनल कॉलनी, पोटे फार्म कठोरा, विलासनगर, गडगडेश्वर, अकोली, अंबापेठ आणि दस्तूरनगर असे सात वसतिगृह सुरू आहेत. सद्य:स्थितीत वसतिगृह हे भाड्याच्या इमारतीत आहेत. आदिवासी विकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या बांधकाम विभागाने नवीन वसतिगृहाच्या इमारतीची उभारणी केली आहे. वसतिगृहाच्या जुन्या इमारतीत एक छोटी अभ्यासिका अस्तित्वात आहे. असे असताना शासकीय मुलांचे वसतिगृह क्रमांक तीन येथील एका तत्कालीन अधिकाऱ्याने काहींना हाताशी धरून वसतिगृहाकरिता स्वतंत्र अभ्यासिका सुरू करण्याचा घाट रचला. ज्या व्यवस्थेची शासकीय नियमांमध्ये कुठेही तरतूद नाही. त्यासाठी शहराचे हृदयस्थान असलेल्या राजकमल चौकातील एका मॉलचा अनेक वर्षांपासून बंद असलेला तिसरा माळा भाड्याने घेण्यात आला. इमारतीचा करारनामा मार्च २०२५ मध्ये दाखवून प्रत्यक्षात त्या इमारतीत अभ्यासिका नऊ ऑगस्ट २०२५ रोजी सुरू केल्या गेली. अर्थात मार्च ते ऑगस्ट २०२५ या सहा महिन्यांचे आठ लाख ६८३ रुपये दर महिन्याचे शासकीय भाडे एकूण ४८ लाख रुपये होते. हा एकप्रकारे अपहार असल्याचा आरोप एकाने आदिवासी विकास विभागाच्या (प्रभारी) विद्यमान अपर आयुक्त आयुषी सिंग यांच्याकडे केला आहे. अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली असून, त्याची चौकशी सुरू करण्यात आली आहे, असे आयुषी सिंग यांनी सांगितले.अभ्यासिकेत उपस्थितीचे प्रमाण अत्यल्प राजकमल चौक येथील एका मॉलमध्ये सुरू करण्यात आलेल्या अभ्यासिकेची क्षमता २५० विद्यार्थ्यांची आहे. असे सांगितल्या गेले. प्रत्यक्षात येथे दररोज ५० च्या आसपास विद्यार्थी येतात, असा दावा देखरेख करणाऱ्या व्यक्तीने केला. दुपारच्या सुमारास भेट दिली असता, प्रशस्त अभ्यासिकेत फक्त एक मुलगा व एक मुलगी, असे दोनच विद्यार्थी हजर दिसले. उपस्थिती जर एवढी अल्प असेल तर आठ लाख रुपये महिना भाडे परवडणार आहे काय? हा मुख्य प्रश्न आहे.

आठवड्यापूर्वीच या अभ्यासिकेसंदर्भात घेतलेल्या आक्षेपाची माहिती अपर आयुक्त आयुषी सिंग यांनी दिली. त्यामुळे याप्रकरणाची चौकशी आता सुरू करण्यात आली आहे. **–लीना बनसोड,** आयुक्त, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य (नाशिक)

# जिल्ह्यात १३ केंद्रांवर ४५३० विद्यार्थ्यांनी दिली 'नीट' परीक्षा

## ११८ परीक्षार्थी विविध कारणांनी गैरहजर, विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक पडताळणी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४ अमरावती** राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत घेण्यात येणारी 'नीट–२०२६' परीक्षा रविवार, ३ मे रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत जिल्ह्यातील १३ केंद्रांवर घेण्यात आली. परीक्षेला एकूण ४ हजार ६४८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. प्रत्यक्षात मात्र ४ हजार ५३० जणांनी परीक्षा दिली तर ११८ विद्यार्थी विविध कारणांनी गैरहजर राहिले. परीक्षा शांततेत पार पडावी. यासाठी ३९० निरीक्षक, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.दरम्यान परीक्षेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने सर्व केंद्रांत कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे निर्देश दिले होते. तसेच परीक्षेच्या एक दिवसा आधी म्हणजे शनिवारी प्रत्येक केंद्राची पाहणी करण्यात आली होती. परीक्षेच्या दिवशीउमेदवारांची काटेकोर तपासणी, नोंदणी आणि बायोमेट्रिक पडताळणी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी पुरेशा वेळेत केंद्रात उपस्थिती दर्शविली, असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. ऑफलाइन (पेन आणि पेपर आधारित) ही परीक्षा घेण्यात – आली. परीक्षेचा कालावधी १८० मिनिटे (३ तास) होता. भौतिकशास्त्रफिजिक्स), रसायनशास्त्र जीवशास्त्र (बायोलॉजी) अभ्यासक्रमावर आधारित पेपर घेण्यात आले. यावेळी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय पथके आणि रुग्णवाहिका केंद्रांवर सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. तसेच वीजपुरवठा खंडित होणार नाही याचीही दक्षता घेण्यात आली होती. परीक्षा ही सुरळीत पार पडली.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा  आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# डिजिटल ज्ञानाचे दार खुले! रिमोटच्या एका क्लिकने 'ई-वाचनालय'चे लोकार्पण

## माजी सरन्यायाधीशांचा नगर परिषदेत विशेष गौरव

### नगरसेवक निलेश विश्वकर्मा यांची संकल्पना तर नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा यांचा पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ चांदूर रेल्वे**

विद्यार्थी, स्पर्धा परीक्षार्थी आणि वर्क-फ्रॉम-होम करणाऱ्यांसाठी मोठी आनंदाची बातमी ठरावी असा आधुनिक उपक्रम रविवारी चांदूर रेल्वेत साकार झाला. नगरपरिषदेच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक ई-वाचनालयाचे लोकार्पण माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते रिमोटचे बटण दाबून करण्यात आले. या उपक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक करत काळाची गरज ओळखून उचललेले प्रेरणादायी पाऊल अशी प्रशंसा केली.नगरसेवक निलेश विश्वकर्मा यांच्या संकल्पनेतून आणि नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा यांच्या



पुढाकाराने साकारलेले हे ई-वाचनालय शहरासाठी ज्ञानाचा नवा अध्याय ठरणार आहे. रविवारी न्यायालयाच्या नव्या इमारतीच्या भूमिपूजनासाठी आलेले माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी नगरपरिषदेच्या भेटीदरम्यान या प्रकल्पाचे अनावरण केले. सदर कार्यक्रमात नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा व निलेश विश्वकर्मा यांनी शाल-श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन भुषण गवई यांचे स्वागत केले. शहरातील विविध मान्यवरांनीही त्यांचा सत्कार केला.

या ई-वाचनालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महागडी व दुर्मिळ पुस्तके डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा नगरपरिषदेचा मानस आहे. तसेच मोफत इंटरनेट सुविधा देण्याची घोषणा करण्यात आली. वर्क-फ्रॉम-होम करणाऱ्यांसाठी स्वतंत्र कार्यक्षेत्र उभारले जाणार असल्याची माहितीही देण्यात आली. भुषण गवई यांनी या प्रकल्पाचे कौतुक करत विश्वकर्मा दांपत्याचे अभिनंदन केले आणि डिजिटल शिक्षणाचा प्रसार ग्रामीण व छोट्या शहरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाला मुंबई हायकोर्टचे न्यायमूर्ती अनिल किलोर, न्यायमूर्ती प्रवीण पाटील, खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप, अधिकारी वर्ग, नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी, नगरसेवक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. नव्या युगातील शिक्षण व डिजिटल सुविधा एकत्र आणणारे हे ई-वाचनालय चांदूर रेल्वेतील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे आधुनिक केंद्र ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# अचलपूरमध्ये भीषण आग

## 'आदर्श फर्निचर'सह ७ दुकाने भस्मसात, लाखोंचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती** अमरावती जिल्ह्यातील अचलपूर-परतवाडा परिसरात अचानक लागलेल्या भीषण आगीमुळे मोठी खळबळ उडाली असून 'आदर्श फर्निचर'सह सुमारे ६ ते ७ दुकाने पूर्णतः जळून खाक झाली.रविवारी सायंकाळच्या सुमारास लागलेल्या या आगीने काही क्षणांतच विक्राळ रूप धारण करत संपूर्ण परिसराला वेढा घातला. आगीची तीव्रता इतकी प्रचंड होती की धुराचे लोट आणि ज्वाळा दूरवरूनही दिसत होत्या.प्राथमिक माहितीनुसार, 'आदर्श फर्निचर' या दुकानातून आगीची सुरुवात झाली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे. दुकानाचे मालक प्रविण गजानन बालापुरे यांनी अवघ्या एका वर्षापूर्वी सुमारे १२ लाखांचे कर्ज घेऊन व्यवसाय सुरू केला होता. मात्र, या आगीत त्यांचा संपूर्ण माल आणि साहित्य जळून




खाक झाल्याने त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.घटनेची माहिती मिळताच अचलपूर, चांदूर बाजार, दर्यापूर आणि चिखलदरा येथील अग्निशमन दलाच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करत अनेक तासांच्या प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आणली. या दरम्यान पोलिस प्रशासन, नगरपरिषद अधिकारी तसेच स्थानिक नागरिकांनीही बचावकार्यात सक्रिय सहभाग घेतला.सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे व्यापारी वर्गात हळहळ व्यक्त केली जात असून प्रशासनाने तातडीने मदत करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# सुधर जाओ, वर्णा आपका समय...

## नवे एसपी निकेतन कदम यांचा ॲक्शन प्लॅन तयार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

गुन्हा घडण्याची वाट न पाहता तो घडूच नये, याकरिता जिल्ह्यात प्रो-ॲक्टिव्ह पोलिसिंगवर आपला भर राहील, अशी माहिती अमरावतीचे नवीन पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी दिली. रविवारी (ता. तीन) त्यांनी रुजू झाल्यानंतर पहिल्यांदाच प्रसार माध्यमांशी संवाद साधला. २०१९ च्या बॅचचे ते आयपीएस अधिकारी असून, त्यांचा परिविक्षाधीन कालावधी अमरावती ग्रामीणमध्येच गेला. त्यानंतर त्यांनी लातूर एएसपी, नागपूर शहर पोलिस उपायुक्त आणि त्यानंतर पदोन्नतीवर अमरावती पोलिस अधीक्षक, असा त्यांचा पोलिस खात्यात आतापर्यंतचा प्रवास राहिला आहे. मूळ नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील एका गावात त्यांचे शालेय शिक्षण झाले. त्यानंतर



पॉलिटेक्निक व त्यानंतर अभियांत्रिकीची पदवी त्यांनी घेतली. तेथून पुढे मुंबईमध्ये एका आय. टी. कंपनीत त्यांनी दोन वर्षे नोकरी करीत असतानाच यूपीएससीची तयारीसुद्धा केली. वडील महावितरणमध्ये वायरमन म्हणून नोकरी करीत होते. आयपीएस अधिकारी म्हणून रुजू झाल्यावर जनतेची नि:स्वार्थ सेवा, यावर आपण आधीपासून भर देण्याचे निश्चित केले व त्यानुसार कामाला प्राधान्य दिले. क्राइम प्रिव्हेंशन आणि डिटेक्शनवर भविष्यात भर दिल्या जाईल. पोलिस खात्यात तिसरे महत्त्वाचे व आव्हानात्मक काम म्हणजे कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवणे हे आहे. त्यामुळे शांतता प्रस्थापित करण्यासाठी जे कुणी प्रयत्न करतील, पोलिस त्यांच्या सातत्याने पाठीशी उभे राहील. अवैध व्यवसायाला प्रतिबंध घातल्या जाईल. त्यात लिप्त कुणी आढळल्यास त्यांच्यावर कडक कारवाई केल्या जाईल, असेही पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी सांगितले.

**सुधर जाओ, वर्णा आपका समय...**


एकीकडे जनतेच्या सेवेसाठी पोलिसिंग करीत असताना दुसऱ्या बाजूने सराईत गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिसांना असलेले अधिकार निश्चित वापरल्या जातील. मकोका, एमपीडी, हद्दपारी आदी अनेक पर्याय भविष्यात वापरल्या जाणार आहेत. त्यामुळे सुधर जाओ.. वर्णा आपका समय आने वाला है.. या शब्दात त्यांनी सराईत गुन्हेगारांना इशारा दिला.

# वरातीत नाचण्यावरून सशस्त्र चकमक, तीन जण जखमी

**आठ अटक टाकळी जहाँगीर परिसरातील घटना**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नांदगाव पेठ**

नांदगावपेठ हद्दीत टाकळी जहाँगीर परिसरात लग्नाच्या वरातीमध्ये नाचण्यावरून झालेला वाद मिटल्यानंतर त्याचा वचपा काढण्याच्या हेतूने आठ ते दहा जणांच्या गटाने युवकावर सशस्त्र हल्ला केला. हल्ल्यात तिघे जखमी झाले. शनिवारी (ता. दोन) मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास ही घटना घडली. रविवारी (ता. तीन) नांदगावपेठ ठाण्यात आकाश प्रकाश सोनवणे (वय २८, रा. टाकळी जहाँगीर) यांच्या तक्रारीवरून संशयित यश




> वऱ्हातीत नाचण्याच्या क्षुल्लक कारणावरून हा वाद झाला आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई केली. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात असून परिसरात शांतता आहे.
> **-दिनेश दहातोंडे,** पोलिस निरीक्षक, नांदगावपेठ.

धीरज दाभणे, ओम काळपांडे (सर्व रा. टाकळी जहागीर, जि. अमरावती), अशा आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली, असे नांदगावपेठचे पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांनी सांगितले. दोन मे रोजी रात्री दहा ते बाराच्या दरम्यान ही घटना टाकळी बाजार परिसरात रात्री दहा वाजता पोहोचली. येथे वरातीमध्ये नाचण्यावरून वाद झाला आणि फिर्यादीने मध्यस्थी करून तो वाद मिटवला होता. मध्यरात्री आकाश मित्रासह गावातील विहाराजवळ असताना सात ते आठ संशयित तेथे आले. संशयितांपैकी एकाजवळ चाकू, दुसऱ्याजवळ रॉड, तर काही लोकांकडे दगड होते. हाणामारीत व हल्ल्यात मोहीत गवई, अमर रामरतन सोनवणे व सुमित धुंदळेवर चाकू, रॉडनी हल्ला केला. प्रतीक प्रमोद कांबळे हे दगडफेकीत जखमी झाले. नांदगावपेठ पोलिसांनी बेकायदेशीर जमाव करून दगड व रॉडच्या साहाय्याने मारहाण केल्याप्रकरणी तक्रारीवरून संबंधितांवर गुन्हा दाखल केला.

# आरटीई प्रवेश प्रक्रियेला आठ मेपर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती,**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेला पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार आता 'लकी ड्रॉ'मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आठ मेपर्यंत कागदपत्रांची पडताळणी करून आपला प्रवेश निश्चित करता येणार आहे. प्राथमिक शिक्षण संचालक कार्यालयाकडून ही अधिसूचना देण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून आरटीई प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यातील २४३ शाळांमधील २५०६ जागांसाठी यंदा ही प्रक्रिया राबविण्यात आली असून तब्बल सात हजारांवर ऑनलाइन




अर्ज प्राप्त झाले होते. सोडतीमध्ये निवड झालेल्या किती विद्यार्थ्यांची प्रवेशनिश्चिती झाली, याबाबत शिक्षण विभागाकडे अद्याप कुठलीही माहिती आलेली नाही. प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिलेल्या मुदतवाढीमुळे निवडयादीत नाव असलेल्या आणि अद्याप प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळणार आहे. निवडयादीतील विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाल्यानंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात येणार आहे.

# तिवसा तालुक्यात वादळी वाऱ्यांचा तडाखा

## घराचे पत्रे उडून कुटुंब उघड्यावर!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४तिवसा-** शनिवारी दुपारनंतर तिवसा तालुक्यासह शहरात अचानक हवामानात मोठा बदल झाला. कडाक्याच्या उन्हाने हैराण झालेल्या नागरिकांना काही वेळातच दिलासा मिळेल, असे वाटत असतानाच आकाशात काळे ढग दाटून आले आणि जोरदार वादळी वाऱ्याने परिस्थिती गंभीर झाली.

वादळी वाऱ्याचा वेग अचानक वाढल्याने शहरातील विविध भागात किरकोळ नुकसान झाले असून, तिवसा शहरातील प्रभाग क्रमांक १३ मधील हातमजुरी करणारे मोरेश्वर गणपत राजहुके यांच्या घराचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या घरावरील टिन पत्रे



वाऱ्याच्या जोरदार झोतामुळे उडून गेल्याने घराची मोठ्या प्रमाणात पडझड झाली. या घटनेमुळे संपूर्ण कुटुंब अक्षरशः उघड्यावर आले असून त्यांचे संसारोपयोगी साहित्यही बाधित झाले आहे.अचानक घडलेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी आर्थिक फटका मोठा बसला आहे.या घटनेनंतर संबंधित नुकसानग्रस्त कुटुंबाने प्रशासनाकडे तात्काळ पंचनामा करून योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. नागरिकांकडूनही प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन मदत करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# अमरावती विद्यापीठात 'छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा' पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु

## प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी 'एम.ए. (छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन)' या विशेष पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शिवरायांचे विचार आणि त्यांचे प्रगत व्यवस्थापन कौशल्य आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

अभ्यासक्रमाची प्रमुख वैशिष्ट्य

या अभ्यासक्रमात केवळ इतिहासच नव्हे, तर शिवरायांच्या काळातील प्रशासकीय आणि लष्करी व्यवस्थापनाचा आधुनिक दृष्टिकोनातून अभ्यास केला जाणार आहे. अभ्यासक्रमात प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा सखोल अभ्यास, शिवकालीन व्यवस्थापन कौशल्यांचा आधुनिक व्यवस्थापनात वापर, नेतृत्व, संघटन कौशल्य आणि व्यक्तिमत्व विकास, स्पर्धा परीक्षा आणि करिअरसाठी उपयुक्त पाठ्यक्रम, इतिहास, विचारधारा आणि व्यवस्थापन यांचा त्रिवेणी संगम, आदी बाबींवर भर दिला जाईल.




पात्रता आणि प्रवेश

कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी धारण केलेले विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी पात्र असून इच्छुक उमेदवारांना आपले प्रवेश निश्चित करण्यासाठी ९८३४१४५९९३, ९०७५९६८१५, ९४२२१५७७४५ या भ्रमणध्वनीवर संपर्क करावयाचा आहे. तरी जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी या अभ्याक्रमाकरीता प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे. काही अडचण असल्यास विद्यार्थ्यांनी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांचेशी ७४१०५५०३२५ यावर संपर्क साधता येईल.

# कारागृहातील बंदीचे प्रमाणपत्र बनावट

## पॅरोलवर रजेसाठी खटाटोप : फसवणुकीचा गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** गुन्ह्यामध्ये अमरावती कारागृहात शिक्षा उपभोगणाऱ्या बंदीने अभिवचन रजा मिळावी म्हणून वडिलांच्या आजाराचे बनावट प्रमाणपत्र सादर केल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. त्यात फ्रेजरपुरा पोलिसांनी शिक्षाधीन बंदीविरुद्ध फसवणूक व विश्वासघातप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. स्वप्नील अजाबराव खरपे (वय ३९, रा. रुक्मिणीनगर, अमरावती), असे गुन्हा दाखल झालेल्या शिक्षाधीन बंदीचे नाव असल्याचे फ्रेजरपुरा पोलिसांनी सांगितले. कारागृहातील कर्मचारी दीपक रमेश टोणपे (वय ४५) यांनी सदर प्रकरणात फ्रेजरपुरा पोलिसांत तक्रार नोंदविल्यानंतर एफआयआर दाखल झाला. फेब्रुवारी २०२६ मध्ये शिक्षाबंदी स्वप्नील खरपे याने वडिलांच्या वैद्यकीय उपचाराकरिता नियमित पॅरोलवर रजा मिळण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती कारागृह प्रशासनाकडे



अर्ज सादर केला होता. अर्जासोबत वडिलांच्या आजाराचे अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातून वितरित झालेले प्रमाणपत्र जोडले होते. कारागृह प्रशासनाला वैद्यकीय प्रमाणपत्रा बाबत संशय आल्यामुळे त्याची शहानिशा करण्यासाठी बंदीने जोडलेले प्रमाणपत्र तपासणीकरिता जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासनाकडे पाठविले. त्याबाबत इर्विन रुग्णालयाकडून एक अभिप्राय कारागृह प्रशासनाला प्राप्त झाला आहे. शिक्षाबंदी स्वप्नील खरपे याने जोडलेले वडिलांच्या आजाराचे प्रमाणपत्र इर्विनमधून निर्गमित झाले नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे बंदी स्वप्नील याने बनावट कागदपत्रे तयार करून फसवणूक करण्याच्या उद्देशाने हे कृत्य केल्याचा ठपका तक्रारीत ठेवण्यात आला आहे.दोन महिन्यांपूर्वीही घडली होती घटना दोन महिन्यांपूर्वी मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंदींनी कारागृह प्रशासनाकडे रजेसाठी अर्ज सादर केले होते. त्यासाठी बहुतांश लोकांनी वैद्यकीय कारण दिले होते. त्याची तपासणी केली असता , १५ बंदींचे प्रमाणपत्र बनावट निघाल्याने त्यांच्या विरुद्ध आधीच गुन्हा दाखल झाला होता. आता पुन्हा हे प्रकरण उजेडात आले.

सांध्य दैनिक **विदर्भ प्रजासत्ताक** https://epaper.vidarbhaprajasattak.com सोमवार दि. ४ मे २०२६


# शेतकऱ्यांना 'ट्रीप'चे आमिष; तेलंगणा-आंध्र बियाण्यांचा विदर्भात शिरकाव

## आमिषांमुळे वाढतोय धोका; दर्जा आणि विश्वासार्हतेवर संशय

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती** खरीप हंगामाची चाहूल लागताच जिल्ह्यात तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकातून कपाशी बियाण्यांची गुपचूप आवक सुरू झाली आहे. अमरावती शहरातील काही ठरावीक स्पॉट वरून शेतकर्‍यांना मोफत प्रवास, बियाण्यांवर सूट आणि जादा उत्पादनाचे आमिष दाखवत परराज्यातून बियाणे खरेदीसाठी नेण्याचा प्रकार उघड होत आहे. विशेष म्हणजे, शेतकरी घेऊन जाणार्‍या खासगी वाहनचालकांनाही आर्थिक लाभ दिला जात असल्याची चर्चा रंगली आहे.

खरीप हंगामाला अजून काही आठवडे शिल्लक असतानाच अप्रामाणित व संशयित बियाण्यांची विक्री करणारे सक्रिय झाले आहेत. परराज्यातून चोरट्या मार्गाने बियाण्यांची वाहतूक सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. शेतकर्‍यांना कमी दरात दर्जेदार बियाणे मिळण्याचे आश्वासन दिले जात आहे. काही ठिकाणी वाहनभाडेही संबंधितांकडूनच दिले जात असल्याची माहिती आहे. त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील अनेक शेतकरी गटागटाने तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात जाऊन बियाणे खरेदी करत असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये खासगी वाहन चालकांचीही मोठी भूमिका




असल्याची चर्चा आहे. शेतकरी घेऊन आल्यास चालकांना जादा कमिशन दिले जात असल्याने अनेक वाहनचालक या व्यवहारात सक्रिय झाल्याचे सांगितले जात आहे. 'मोफत प्रवास आणि स्वस्त बियाणे' या दुहेरी आमिषामुळे काही शेतकरी भूलथापांना बळी पडण्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, 'ही व्हरायटी जादा उत्पादन देईल' असे सांगून शेतकऱ्यांना आकर्षित केले जात आहे. साधारण १५ मेपासून शेतकरी बियाणे खरेदीला सुरवात करतात. जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस झाल्यानंतर कपाशी लागवडीचा वेग वाढतो. सिंचन सुविधा असलेले काही शेतकरी मॉन्सूनपूर्व लागवडही करतात. बोंडअळीची साखळी तोडण्यासाठी कृषी विभागाने एक जूनपूर्वी बियाणे विक्री टाळण्याच्या सूचना दिल्या आहेत. शेतकरी आतापासूनच बियाण्यांच्या शोधात निघाले आहेत. याच परिस्थितीचा फायदा घेत परराज्यातील बियाणे विक्रेते सक्रिय झाल्याचे चित्र आहे. आलिशान वाहनांतून चोरट्या मार्गाने बियाण्यांची वाहतूक होत असल्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. कृषी विभागाकडे बोगस बियाण्यांवर कारवाईसाठी पथके असली तरी कार्यक्षेत्राबाहेरील व्यवहारांवर थेट कारवाई करणे कठीण ठरत आहे. परिणामी, शेतकर्‍यांची फसवणूक होण्याचा धोका वाढला आहे.इतर राज्यांतून आणलेले बियाणे वांझ निघाल्यास न्याय मागणे कठीण होईल शेतक र्‍यांनी पेरणीयोग्य पाऊस झाल्या शिवाय घाई करू नये. जिल्ह्यात कपाशी बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. परराज्यातील आमिषांना बळी पडू नये. असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# भातकुली पंचायत समितीत महिला परिचारिकेवर जीवघेणा हल्ला

## डोक्यावर काचेची बॉटली फोडून माथेफेरी युवकाकडून पोटात खूपसण्याचाही पर्यंत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ अमरावती**

अमरावतीच्या भातकुली पंचायत समिती परिसरात एका महिला कर्मचारी परिचारिकेवर काचेच्या बाटलीने प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ३० वर्षीय आरोपीने महिलेच्या डोक्यावर काचेची बाटली फोडून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर येत आहे.या हल्लयात प्रणाली लबडे ही महिला कर्मचारी गंभीर जखमी झाली



असून तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे,घटनेनंतर पंचायत समिती परिसरात एकच खळबळ उडाली असून कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दिवसा ढवळ्या घडलेल्या या प्रकारामुळे सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून आरोपीला अटक करण्यात आली आहे या हल्लयामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.या घटनेमुळे शासकीय कार्यालयांमधील महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, संबंधित प्रशासनाने तातडीने सुरक्षा उपाययोजना वाढवण्याची मागणी कर्मचाऱ्यांकडून केली जात आहे.

# इन्स्टाग्रामवरून ओळख, अल्पवयीन मुलीचा गैरफायदा

## अश्लील फोटो पाठवून धमकी देणारा आरोपी बेनोडा पोलिसांच्या ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ अमरावती–**

अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील बेनोडा येथे अल्पवयीन मुलीचा गैरफायदा घेत अश्लील फोटो व व्हिडिओद्वारे धमकी देणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, सोशल मीडियाच्या माध्यमातून वाढणाऱ्या गुन्ह्यां बाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे.पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाबु हसन उर्फ बबलु हसन (वय २२, रा. मुरादाबाद, उत्तरप्रदेश) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पीडित अल्पवयीन मुलगी आणि आरोपी यांची दोन वर्षांपूर्वी इन्स्टाग्रामद्वारे ओळख झाली होती. ओळखीतून मैत्री वाढली आणि त्याच दरम्यान मुलीने काही वैयक्तिक फोटो आरोपीला पाठवले होते.दरम्यान, ५ जानेवारी २०२६ रोजी आरोपी उत्तरप्रदेशवरून नागपूर येथे आला आणि पीडितेला भेटण्यासाठी बोलावले. या भेटीदरम्यान मुलीच्या इच्छेविरुद्ध गैरकृत्य केल्याचा आरोप आहे. काही दिवसांनंतर दोघांमध्ये वाद झाल्याने पीडितेने आरोपीचा संपर्क पूर्णपणे तोडून त्याचा मोबाईल क्रमांक ब्लॉक केला.यामुळे संतप्त झालेल्या आरोपीने पीडितेचे अर्धनग्न व




आक्षेपार्ह फोटो तिच्या आई व आजीला व्हॉट्सअॅपवर पाठवले. तसेच हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत पीडितेचा विनयभंग केला. या प्रकारामुळे घाबरलेल्या पीडितेने कुटुंबीयांसह बेनोडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.तक्रारीवरून बेनोडा पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७५(१)(२), ७८(२), ७९, ३५१(२) तसेच पॉक्सो कायद्याच्या कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा नोंद केला आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत ३० तारखेला आरोपीला अटक केली असून, सध्या तो न्यायालयीन कोठडीत आहे.या प्रकरणामुळे सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींशी संपर्क ठेवताना विशेष खबरदारी घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे. तसेच पालकांनीही मुलांच्या ऑनलाईन वावरावर लक्ष ठेवणे अत्यावश्यक असल्याचे पोलीस प्रशासनाने आवाहन केले आहे.

# वलगाव-चांदूरबाजार मार्गावर जनावरांच्या वाहनांकडून पोलिसांची कथित वसुली

## स्टिंग ऑपरेशनमध्ये प्रकार उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती :** वलगाव ते चांदूरबाजार मार्गावर जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनांना अडवून पोलिसांकडून कथित वसुली केली जात असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. दर रविवारी चांदूरबाजार येथे मोठा जनावरांचा बाजार भरतो, ज्यामध्ये बकऱ्या, बैल, गायी आणि म्हशींची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होते. बाजारातून खरेदी केलेली जनावरे मालक पावत्यांसह आपल्या गावी नेण्यासाठी लोडिंग वाहनांचा वापर करतात.मात्र, वाहनचालकांच्या म्हणण्यानुसार, चांदूरबाजार ते अमरावती दरम्यान विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वाहनांना अडवून प्रत्येकी २०० ते ४०० रुपयांची मागणी केली जाते. सर्व कागदपत्रे वैध असूनही पैसे न दिल्यास त्रास दिला जातो, वेळ



वाया घालवला जातो, असा आरोप चालकांनी केला आहे. त्यामुळे वाहनचालक जनावर मालकांकडूनच अतिरिक्त पैसे घेऊन ही रक्कम भागवतात, परिणामी याचा थेट आर्थिक फटका शेतकरी व जनावर मालकांना बसत आहे.या प्रकरणाची पडताळणी करण्यासाठी करण्यात आलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये वलगाव परिसरात पोलिसांचे चक-२७/ ऊऊ २५४२ क्रमांकाचे वाहन उभे करून काही गाड्या अडवण्यात येत असल्याचे दृश्य समोर आले आहे. तसेच काही वाहनांकडून पैसे घेतल्याचे कथित व्हिडिओ पुरावेही समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे.या सर्व प्रकारामुळे जनावरांच्या वाहतुकीवर अनावश्यक आर्थिक बोजा पडत असून, संबंधित यंत्रणेकडून याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व वाहनचालकांकडून होत आहे.

# मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील ब्रिटीशकालीन पूल धोक्यात

## दुरुस्तीला तात्काळ मान्यता द्या - युवक काँग्रेसची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ मेळघाट**

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्प परिसरातील आदिवासी भागात असलेले ब्रिटीशकालीन पूल सध्या अतिशय जीर्ण अवस्थेत असून तुटण्याच्या स्थितीत पोहोचले आहेत. या पुलांची मुदत संपलेली असून याबाबत ब्रिटीश सरकारकडून भारत सरकारला पत्रही प्राप्त झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या पुलांच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीच्या कामांना तात्काळ मान्यता देण्याची मागणी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांनी केली आहे.तसेच, व्याघ्र प्रकल्प प्रशासनाने या कामांसाठी आवश्यक परवानग्या लवकरात लवकर द्याव्यात, तसेच अस्तित्वात असलेल्या रस्त्यांना देखील नियमित करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा शांत असलेला आदिवासी समाज आक्रमक भूमिका घेत आंदोलन छेडेल, असा इशाराही



देण्यात आला आहे.दरम्यान, एका बाजूला जनहिताची कामे अडवली जात असताना दुसऱ्या बाजूला दिल्ली वाइल्ड बोर्डाची परवानगी नसताना प्रकल्पाच्या अंतर्गत शेकडो हेक्टर जमिनीवर खोदकाम सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. जेसीबीद्वारे रस्ते तयार केले जात असल्याने या प्रकरणाची केंद्रीय समितीमार्फत सखोल चौकशी करण्याची मागणीही राहुल येवले यांनी केली आहे.

# जिल्ह्यावर तीन दिवस 'वादळी' संकट!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

प्रचंड उकाड्यानंतर आता हवामान अचानक बदलले आहे. पुढील तीन दिवस जिल्ह्यावर वादळी संकट घोंगावणार आहे. हवामान विभागाने चार ते सहा मेदरम्यान विजांच्या कडकडाटासह वादळ



वार्‍याचा येलो अलर्ट जारी केला आहे. या कालावधीत ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. दुपारनंतर ढगाळ वातावरण, विजांचा कडकडाट आणि जोरदार वारे यामुळे जनजीवन विस्कळित होण्याची शक्यता आहे. विशेषतः कच्ची घरे, झाडे, वीजवाहिन्या आणि शेतातील पिकांना फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भासह अमरावती सह जिल्ह्यात मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. अवकाळी वातावरणामुळे शेतकर्‍यांची चिंता वाढली आहे. काढणीस आलेले उन्हाळी पीक, भाजीपाला तसेच साठवून ठेवलेले धान्य सुरक्षित ठेवण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली उभे राहू नये, उघड्या मैदानात जाणे टाळावे तसेच मोबाईलचा वापर कमी करावा, असे आवाहन केले आहे. तापमानाचा पारा ४५ अंशांच्या पुढे गेल्यानंतर आता हवामानात अचानक बदल होत आहे. उष्णतेच्या लाटेनंतर येणार्‍या या वादळी वातावरणामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# सत्यम गांधींची 'सिंघम' स्टाइल कारवाई

## महिलांचे हाल पाहून थेट आदेश, अधिकाऱ्यांनाही अल्टिमेटम

### ५ दिवसात समस्या सुटल्या नाही तर थेट निलंबनाची होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ मेळघाट–** उन्हाळ्याच्या कडाक्यात मेळघाटातील अनेक गावांमध्ये सध्या भीषण पाणी टंचाईची समस्या जाणवत आहे. ती निवारण्यासाठी आणि स्पॉटवर उपाययोजना करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी थेट मैदानात उतरल्याचे पाहायला मिळाले. गांधी यांनी मेळघाटातील अनेक गावांचा मॅरेथॉन दौरा करत इतरही समस्या जाणून घेतल्या.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी स्वतः शनिवारी (२ मे) पहाटे ते रात्री उशिरापर्यंत चिखलदरा आणि धारणी तालुक्यातील दुर्गम गावांचा दौरा करत पाणीटंचाईची भीषण वास्तवता प्रत्यक्ष अनुभवली. तारूबांदा येथे महिला विहिरीतून हाताने पाणी काढत डोक्यावरून वाहून नेत असल्याचं दृश्य पाहून सीईओ संतापले आणि तातडीच्या उपाययोजनांचे आदेश देत त्यांनी निष्काळजी अधिकाऱ्यांवर निलंबनाचा बडगा उचलण्याचे स्पष्ट संकेत दिले.

तारूबांदा येथे पाणीपुरवठा पूर्णतः ठप्प असल्याने ग्रामस्थांना विहिरीतून हाताने पाणी काढून डोक्यावर वाहून न्यावे लागत आहे. हे दृश्य पाहताच सीईओ सत्यम गांधी यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत तत्काळ विहिरीवर जाळी बसवणे, १५व्या वित्त आयोगातून मोटर आणि स्टँडपोस्ट उभारणे, टेंडर प्रक्रिया



ताबडतोब सुरू करण्याचे आदेश ग्रामपंचायतीला दिले. सोलर पंप बसेपर्यंत तात्पुरती व्यवस्था उभारण्याचेही निर्देश त्यांनी दिले आहेत.

**५ दिवसात समस्या सुटल्या नाही तर थेट निलंबन**

धारणी तालुक्यातील कढाव येथे ग्रामस्थांनी थेट सीईओ सत्यम गांधी यांच्याकडे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांविरोधात तक्रारी केल्या. पुढील पाच दिवसांत समस्या निकाली निघाली नाही तर संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. गट विकास अधिकाऱ्यांना विस्तार अधिकारी पंचायत यांना तत्काळ गावात पाठवण्याचे आदेशही त्यांनी दिले. या मॅरेथॉन दौऱ्यात कोहाना, बिहाली, माखला, टेमभूरढाणा, भिलोजा, राक्षा, आढाव, ढाकणा, सावऱ्या, बोरिखेडा अशा एकापाठोपाठ एक गावांना भेटी देण्यात आल्या. प्रत्येक ठिकाणी थेट प्रश्न विचारत त्रुटींवर जागीच उपाय सांगण्याची सीईओ यांची पद्धत अधिकाऱ्यांना नक्कीच जड गेली असावी. माखला येथील आरोग्य उपकेंद्रात इन्व्हर्टर चार्ज होत नसल्याचं दिसताच तत्काळ बॅटरी बदलण्याचे, अंगणवाडीतील बंद डिजिटल टीव्ही दुरुस्त करण्याचे आदेश मिनिटांत दिले गेले. आढाव येथे सीईओ सत्यम गांधी यांनी स्वतः टॅब उघडून पाणीपुरवठ्याची खात्री केली. एक दिवसाआड पाणी मिळत असल्याचे समोर येताच दररोज सकाळी पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आदेश दिले.